# 30 बोगस शिक्षकांना कर्जाचे वाटप

## महिला सहकारी बँकेत लाखोंचा कर्ज घोटाळा ? खातेदारांची धावाधाव अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर( दि.14 )** – अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकेच्या अचलपूर येथील जुना सराफा शाखेत लाखोंचा कर्ज घोटाळा झाला आहे. यासंदर्भात तक्रार अचलपूर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. बँकेने बोगस शिक्षकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचे कर्ज दिल्याचा आरोप केला जात आहे. हा प्रकार उघडकीस येतात, खातेदारांची धावाधाव सुरु झाली आहे. पाच जणांनी याप्रकरणी पोलिसांना तक्रार दिल्यानंतर तुर्तास चौकशी आरंभिण्यात आली आहे.




सध्या बँकेतील या शाखेत दोनच कर्मचारी कार्यरत आहेत. एक व्यवस्थापक आणि दुसरा रोखपाल आहे. बँक व्यवस्थापकाने बँकिंग क्षेत्रातील सर्व नियम व अटी झुगारून कर्ज वाटपाच्या नावाखाली घोटाळा केल्याचा आरोप होत आहे. परतवाडा येथील एक दलाल गरजू लोकांशी संपर्क साधून त्यांना कर्ज देण्याचे आश्वासन देत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, 30 जणांना बोगस शिक्षक असल्याचे दाखवून बँकेतून कर्जाच्या नावावर प्रत्येकी दोन लाख रुपयांची रोख रक्कम काढण्यात आली. या 30 व्यक्तींपैकी कोणीही शिक्षक नाही. ही फसवणूक उघडकीस येऊ नये म्हणून प्रत्येक कर्जदाराचे दोन-तीन हप्ते नियमित जमा केले जात होते. नंतर कर्जाचे हप्ते जमा होणे बंद झाल्यावर बँकेच्या अमरावती मुख्यालयातील अधिकारी घरोघरी पोहोचले, तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे या लोकांना समजले.

मेळघाटातील अतिदुर्गम भाग असलेल्या हातरू, सलोना, रायपूर, जरिदा आदी गावांमध्ये शिक्षक असल्याचे भासवून कर्ज देण्यात आले. अवैध धंद्यात गुंतलेल्या तरुणाला देखील शिक्षक असल्याचे भासवून दोन लाखांचे कर्ज दिले. याप्रकरणी सुरेश ढोबळे व इतर तीन तरुणांनी अचलपूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### पाच जणांनी तक्रार केली

यााप्रकरणी पाच जणांनी तक्रार दिली आहे. बँकेला पत्र देऊन त्यांच्याकडून कागदपत्रे मागितली जातील. याप्रकरणी कारवाई करण्यापूर्वी वरिष्ठांची परवानगीही घ्यावी लागणार आहे.

**गजानन मेहत्रे**
**पोलीस निरीक्षक, अचलपूर**

# कारा येथील अग्नितांडवात घराची राखरांगोळी



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.14 )** – तालुक्यातील ग्राम कारा येथील आदिवासी शेतकरी चिंतामण राम कासदेकर यांच्या घराला अचानक आग लागून घरातील संपुर्ण साहित्याची राख रांगोळी झाली. ही घटना मंगळवारी( दि.14) घडली.



आज लागण्याचे कारण अद्याप कळू शकले नाही. मात्र या भीषण आगीत आलमारी, धान्य, शिलाई मशीन, कपडे, पैसे इतर साहित्य जळून खाक झाले. आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी नाही झाली. या घटनेची माहिती महसूल विभागाला मिळताच घटनास्थळी धाव घेऊन तलाठी जितेंद्र कासदेकर यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.

# बुलढाण्याच्या तरुणाची साडेसात लाखांनी फसवणूक

**नांदगाव पेठ पोलीसात तक्रार**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून दोन तरुणांची साडेसात लाखांनी फसवणूक करण्यात आली. ही घटना 25 डिसेंबर 2023 ते 28 डिसेंबर 2024 दरम्यान घडली. या घटनेची तक्रार आर्थिक गुन्हे शाखेकडे केली होती. तपासाअंती याप्रकरणात आरोपी आसुपाल ग्यानबा ठोसरे (24, पिंपळगाव सोनार, सिंदखेड राजा, बुलढाणा), श्याम भगवंतराव कुंभीथोप (36, वाळगाव, नांदगाव खंडेश्वर), शिवा रूपराव बनसोड (37, आडगाव, मोर्शी), चेतक राजकुमारसिंग हुशारे (ठाकूर) व मोहन लालसिंग सोळंके (31, चिखली, बुलढाणा) याच्याविरुध्द नांदगावपेठ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा स्थित पिंपलगांव सोनार येथील रहिवासी अक्षय सुधाकर ठोसरे (24) याला आशुपालने शासकीय नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखविले होते. त्यानंतर त्याने त्यांची अन्य चार आरोपींशी ओळख करून दिली. अक्षयला औषध निर्माता अधिकारी म्हणून नोकरी लावण्यासाठी आरोपींनी ऑनलाइन 2 लाख 50 हजार रुपये घेतले. तसेच अक्षयचा मित्र नितीन मधुकर तायडे (29, बुलढाणा) याला विस्तार अधिकारी सांख्यिकी पदावर नोकरी देण्यासाठी 5 लाख रुपये रोख घेतले. हा सर्व व्यवहार रहाटगाव येथील हॉटेल झाला. परंतू त्यानंतर त्यांनी नोकरीवर लावून दिले नाही. अनेक महिने उलटून गेल्यानंतर त्यांनी आरोपींशी अनेकदा संपर्क साधला. मात्र आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत होते. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अक्षय आणि नितीन यांनी याप्रकरणी गुन्हे शाखा पोलिसांकडे लेखी तक्रार दिली. गुन्हे शाखेच्या तपासात नोकरी देण्याच्या नावाखाली पैसे उकळल्याचे समोर आले असून, याप्रकरणी नांदगावपेठ पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चार दुचाकींसह चोराला अटक



## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दुचाकी चोरांना अटक करून, त्यांच्याजवळील चार दुचाकी जप्त केल्या आहेत. नरेश समाधान भांगे (43, रा. अनकवाडी, ता. भातकुली) असे आरोपीचे नाव आहे. त्याला कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त यांनी आदेश दिले होते की, रेकॉर्डवरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगारांना चेक करून त्यांच्यावर पाळत ठेवा आणि योग्य प्रभावी कार्यवाही करा. या आदेशावरून गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 चे पोलीस निरीक्षक नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त माहिती काढणे सुरु केले. दरम्यानच पेट्रोलींग करीत असतांना 12 जानेवारी रोजी पोलिसांना गुप्त माहीती मिळाली कि, सिटी कोतवाली येथील गुन्ह्यातील दुचाकी घेऊन एक इसम हा गांधी चौकात फिरत आहे. या माहीतीवरून पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता, तेथे एक इसम हा होन्डा ॲक्टीव्हा मोपेड वाहनावर संशयरित्या उभा दिसला. पोलिसांनी त्याला घेराव घालुन ताब्यात घेतले.

त्यावेळी त्याने त्याचे नाव नरेश समाधान भांगे असे सांगितले. पोलिसांनी त्याला दुचाकी चोरीबाबत विचारपुस केली असता त्याने उडवा-उडविचे उत्तरे दिले. त्यानंतर पोलिसांनी बारकाईने व कशोशिने विचारपुस केली असता त्याने सदरचे वाहन हे 10 ते 102 दिवसापुर्वी इर्विन दवाखान्यातून चोरी केल्याचे कबुल केले. तसेच शहरातील इतरही दुचाकी चोरी केल्याचे कबुल केले. यावरून पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून चार दुचाकी जप्त केल्या. आरोपीच्या ताब्यातून 1 लाख 40 हजार रुपये किंमतीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या आरोपीकडून आणखी काही गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता आहे.

# दारु पळविणाऱ्याला अकोल्यातून अटक

## गौरी वाईन शॉपमध्ये घडली होती घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरी वाईन शॉपमधून संचालकाला जीवे मारण्याची धमकी देऊन दारुचे बंपर आणि क्वार्टर पळविणाऱ्या दोन आरोपींना डीबी पथकाने अकोल्यातून अटक केली आहे. आरोपींमध्ये अजय शेषराव वानखडे (वय 34) आणि सुनील सखाराम घोलप (वय 32, रा. क्रिचन कॉलनी शासकीय गोडाऊन, अकोला) यांचा समावेश आहे.

गाडगेनगर येथील हर्षराज कॉलनीत सौरभ सोजरानी यांचे गौरी वाईन शॉप आहे. 10 जानेवारी रोजी आरोपींनी वाईन शॉपीवर जाऊन काम करणाऱ्या तरुणांना शिवीगाळ केली आणि धमकी दिली. त्यानंतर तेथील रॅकमधून दारुच्या बॉटल काढल्या. दरम्यान चाकू दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची फिर्याद सौरभने गाडगेनगर पोलीस ठाण्यात दिली.

सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अकोला येथे जाऊन आरोपी अजय वानखडे व सुनील घोलप यांना अटक केली. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक ब्रह्मा गिरी, दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मनोजकुमार मानकर, संजय भेलावे, नीलेश जुनघरे, गजानन बर्डे, सुशांत प्रधान, सागर धरमकर, सिद्धार्थ श्रृंगारे यांनी केली.

# 2 कोटी द्या, अन्यथा आत्महत्या

**अमरावती** – विधवा सुनेने सासुला आत्महत्येची धमकी देऊन दोन कोटीची मागणी केल्याची घटना नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत 13 जानेवारी रोजी उघडकीस आली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी सुनेसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीनुसार, छाया नगर येथे राहणाऱ्या महिलेच्या मुलाचा काही महिन्यांपूर्वी मृत्यू झाला होता. त्यामुळे त्यांची विधवा सून आई-वडिलांच्या घरी राहते. दरम्यानच अधुनमधून सून सासरच्या घरी येत राहते. दरम्यान, सुनेने सासूला आत्महत्येची धमकी देत दोन कोटी रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास सर्वांना अडकविण्याची धमकी दिली. तसेच इतर आरोपींनी महिलेच्या घरी येऊन पैसे न दिल्यास तिच्या मुलांना गुन्ह्यात अडकवू किंवा गुंडांकडून त्यांची हत्या करू, अशी धमकी दिली. तसेच महिलेला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या भीतीपोटी महिलेने अखेर 13 जानेवारी रोजी नागपूरगेट पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. पोलिसांनी सुनेसह चार जणांवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

Universal Sompo General Insurance
Suraksha, Hamesha Aapke Saath
Universal Sompo General Insurance Co Ltd
CORRIGENDUM
With reference to Public Notice published on 08-01-2025 for the Universal Sompo General Insurance Co Ltd. Whereas Relocation of Registered Office published wrongly instead of this please read as **Relocation of Branch Office.** Other matter will be same as published earlier.
Head Administration

# मांजा विक्रेत्याला अटक

## 16 हजाराचा नायलॉन मांजा जप्त




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – 14 जानेवारी रोजी गुन्हे शाखा युनिट कमांक 2 चे पथक पेट्रोलींग करीत त्यांनी गुप्त माहितीवरून महाजनपुरा परिसरात जाऊन पाहणी केली असता, अमोल गणेशराव वाटकर (30, रा. शिवाजी गेटच्या आत, अवधुत मंदीराजवळ, महाजनपुरा, अमरावती) हा व्यक्ती राहत्या घरासमोर एक नायलॉन पिशवीतुन पर्यावरणास घातक असलेला शासन प्रतिबंधीत चायना मांजाचे चकर्या विक्री करीत असतांना मिळुन आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन, त्याच्याजवळील विविध प्रकारचा 16 हजार रुपये किमंतीचा मांजा जप्त केला. याप्रकरणात आरोपी अमोल गणेशराव वाटकर याच्याविरुध्द खोलापुरी गेट येथे बि.एन.एस कलम 223, सहकलम 5 पर्यावरण संरक्षण कायदा 1986 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील, पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली एपीआय महेश इंगाले, पीएसआय संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, योगेश पवार, सागर ठाकरे, संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# अचलपूर जिल्हा निर्मीतीच्या फक्त वावड्याच?

## समाज माध्यमांवर फिरत असलेली माहिती निराधार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.14 )**– महाराष्ट्रात नवे 21 जिल्ह्यांची घोषणा राज्य सरकारकडून 26 जानेवारी रोजी होणाऱ्या असल्याची माहिती समाजमाध्यमावर फिरत आहे. यामध्ये अचलपूर जिल्ह्यांच्या निर्मीतीबद्दलही सांगण्यात आले आहे. माहितीच्या मुळाशी गेल्यावर सदरची माहिती निराधार असून जिल्हा निर्मीतीच्या फक्त वावड्याच उडविल्या जात असल्याचे कळत आहे. जिल्हा प्रशासनाने तुर्तास या माहितीला कुठलाही अधिकृत आधार नसल्याचे सांगितले आहे.



गेल्या 20 वर्षांपासून अचलपूर जिल्हा निर्मीतीची वाट येथील नागरिक पाहत आहे. जेणेकरुन अचलपूरच्या विकासाला गती मिळाली. वास्तवात जिल्हा निर्मीतीची प्रक्रीया अत्यंत खर्चीक असते, ज्याचा ताण सरळसरळ सरकारच्या तिजोरीवर येतो. त्यामूळे सहज कुठलाही जिल्हा निर्माण करण्याची घोषणा केली जात नसल्याची माहिती तज्ञांनी दिली आहे.

### कुठलेच आदेश नाही

समाज माध्यमांवर फिरत असलेली माहिती माझ्याही वाचण्यात आली आहे. अशी कुठलीही माहिती किंवा आदेश जिल्हा प्रशासनाला प्राप्त झालेले नाही.

**अनिल भटकर**
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**अमरावती.**

# नायलॉन मांजा उठला जीवावर

## उड्डानपुलावरील वाहतुक केली बंद

## पोलीस बंदोबस्त लावला



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )**– मकर संक्रातीच्या पर्वावर 14 जानेवारी रोजी शहरात पतंगोत्सवाला उधाण आला होता. महिलांसाठी महत्व सण असणार्या मकर संक्रातीला पतंग उडविणार्यांची संख्या शहरात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून आले. परंतू पतंगोत्सवासोबतच घातक नायलॉन मांजाचे परिणाम पाहता पोलिस यंत्रणाही अलर्ट झाली आहे. मंगळवारी दुपारच्या सुमारास शहरातील उड्डानपुलावरील रहदारीदरम्यान नायलॉन मांजाने वाहन चालकांसाठी अडचण निर्माण झाली होती. काहींच्या गळ्यात, तर काहींच्या वाहनात मांजा अडकल्याचे दिसून आले. त्यामुळे उपाययोजना म्हणून शहरातील तिन्ही उड्डानपुले सायंकाळपर्यंत बंद ठेवण्यात आले होते. अशातच अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट - 2 च्या पथकाने प्रतिबंधीत चायना मांजा विक्री करणार्या एका इसमावर धडक कारवाई केली. मकर संक्रांतीनिमीत्त शहरात पतंगबाजीला उधाण आल्यामुळे मांजामुळे काही ठिकाणी किरकोळ घडल्या आहेत. अशातच उड्डानपुलावरून ये-जा करणार्या वाहनचालकांना नायलॉन मांजाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून पोलिसांनी दोन्ही उड्डानपुलाला बॅरीकेटींग करून बंद केले होते. राजापेठ ते इर्विन चौक, राजापेठ ते कुशल ऑटो आणि पंचवटी चौकातील उड्डानपुल मंगळवारी दिवसभराकरिता बंद करण्यात आले होते.

### गळ्याला दुपटा बांधा!

नायलॉन मांजाचा घातक परिणाम पाहता महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडून सावधगीरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले होते. अशातच दुचाकी चालवितांना गळ्यात दुप्पटा बांधून ठेवा, असे आवाहन पोलिसांनी केले होते. त्यामुळे मंगळवारी अनेक दुचाकीस्वार गळ्याला दुप्पटे बांधून होते. त्यातच फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी लाऊड स्पीकरद्वारे रस्त्यावरून ये-जा करणार्या नागरिकांना नायलॉन मांजाबाबत सतर्क राहण्याचे आवाहन करून गळ्याला दुप्पटा बांधण्याचे आवाहन केले.


# ग्रामपंचायत कार्यालय सालोड

## पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती

## निविदा सुचना

ग्रामपंचायत कार्यालय सालोड, पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती यांचे मार्फत खालील कामाची मोहोरबंद निविदा बी-१ प्रपत्रामध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत सालोड येथून प्राप्त करून निविदा बंद लिफाफा पद्धतीने ग्रामपंचायत कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे विवरण | रक्कम | निविदा फी | भरलेल्या निविदा स्विकृती दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५वा वित्त आयोग | सी.सी. नाली | ३,००,०००/- | २०० रू. | १५-१-२०२५ ते २२-१-२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत | २३-१-२०२५ कार्यालयीन वेळेत |
| २ | १५वा वित्त आयोग | बंधिस्त सी.सी. नाली | ३,५३,५३८/- | २०० रू. | | |
| ३ | १५वा वित्त आयोग | सी.सी. रस्ता | १,९१,३८०/- | २०० रू. | | |
| ४ | १५वा वित्त आयोग | वॉल कम्पाउंड | १,००,०००/- | २०० रू. | | |
| ५ | १५वा वित्त आयोग | हिंदूस्मशान भूमी सौंदर्यीकरण करणे | १,००,०००/- | २०० रू. | | |

टीप- १.निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय सालोड प.सं. नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती यांचे कार्यालयात पहावयास मिळेल.
२.निविदा ह्या द्वि लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहे.
३. निविदा स्विकारण्याचा तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांनी राखून ठेवले आहे.
४. कामाची बयाणा रक्कम अंदाजित कामाच्या १ टक्के राहील.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय सालोड**
**पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर जिल्हा अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेतकऱ्यांना दिलासा; सोयाबीन खरेदीला मुदतवाढ

### 31 जानेवारीपर्यंत विकता येईल सोयाबीन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.14 )**– केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने राज्यातील सोयाबीन खरेदीला 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिल्याने नोंदणीकृत शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. हा निर्णय सोमवारी घेण्यात आला असून, सोयाबीन खरेदीची मुदत रविवारी संपली होती. राज्यात नाफेड, एनसीसीएफ आणि पणनच्या सर्व अधिकाऱ्यांना या मुदतवाढीचे पत्र पाठविण्यात आले आहे.

खुल्या बाजारात सोयाबीनचे दर कोसळल्याने शेतकऱ्यांनी एमएसपी दराने सरकारला सोयाबीन विकण्यास प्राधान्य दिले होते. त्याअनुषंगाने राज्यात एकूण सात लाख 77 हजार 757 शेतकऱ्यांनी नाफेड व एनसीसीएफकडे नोंदणी केली होती. नाफेडच्या बहुतांश खरेदी केंद्रांवर डिसेंबर 2024 च्या शेवटच्या आठवड्यापासून बारदान्याचा तुटवडा जाणवायला लागला आणि सोयाबीन खरेदी बंद पडली. त्यातच 12 जानेवारी रोजी या खरेदीची मुदतही संपली. केंद्र सरकारने महाराष्ट्रासोबतच राजस्थान व तेलंगणामधील सोयाबीन खरेदीला 4 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. महाराष्ट्रात सध्या 5 लाख 55 हजार 705 नोंदणीकृत शेतकऱ्यांकडील सोयाबीनचे मोजमाप व्हायचे आहे. राज्य सरकारने नाफेड व एनसीसीएफला 14.13 लाख टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट दिले होते. या दोन्ही संस्थांनी तीन महिन्यांत केवळ 4 लाख 58 हजार 313 टन सोयाबीन खरेदी केल्याने उद्दिष्टपूर्तीसाठी किमान 9 लाख टन सोयाबीनची आवश्यकता असल्याने दोन्ही संस्थांनी सोयाबीन खरेदीला वेग देणे गरजेचे आहे.

# चायना मांजापासून संरक्षणासाठी धमाल शक्कल

### दुचाकींना लावले सुरक्षा स्टँड ■ मोर्शी पोलीस स्टेशन आणि जीवन सेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाचा उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ( दि.14 )**– पतंग उडविण्यासाठी मुले चायना मांजा उपयोगात आणतात. त्यामुळे कधी कधी दुचाकीस्वारांना अपघात होऊन गंभीर इजा होते. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधून मकर संक्रांत निमित्त मोर्शी शहरामध्ये विविध उपक्रमात अग्रेसर असणाऱ्या जीवन सेतू जलमित्र आपत्ती बचाव दला कडून दुचाकी चालकांच्या संरक्षणासाठी बाईक प्रोटेक्शन स्टॅन्ड लावण्यात आले.

पतंग उडवण्यासाठी लोक चायना मांजा उपयोगात आणतात. त्यामुळे दुचाकी चालकांचे अपघात होऊन गंभीर दुखापत होते. त्याचे संरक्षण होण्याकरिता 150 बाईक प्रोटेक्शन स्टॅन्ड मोर्शी शहरांमध्ये लावण्यात आले आहे. ह्या उपक्रमात जीवन सेतू जलमित्र आपत्ती बचाव दलास प्रशासनाने प्रोत्साहित केले. प्रशासनाचे सहकार्य घेऊन मोर्शी पोलीस स्टेशन समोर हा उपक्रम राबविला.

पशुपक्ष्यांसह मानवी जीवनाला नायलॉन मांजा घातक ठरत असल्यामुळे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) काचेचे लेपण लावलेल्या नायलॉन, तंगुस अशा कृत्रिम दोऱ्यांपासून बनवलेला %मांजा% उत्पादन, साठा, विक्री व खरेदीवर बंदी घातली आहे. तरीही पतंगासाठी नायलॉन, मांजा या सांकेतिक नावाने चायनीज व भारतीय बनावटीचा मांजा सर्रास विकला जात आहे. त्यामुळे नागरिकांना घातक मांजा न वापरण्याबद्दल माहिती देण्यात आली व बाईक प्रोटेक्शन स्टॅन्ड लावण्यात आले. या कार्यामध्ये पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, पोलीस अंमलदार स्वप्निल बायस्कर, वाहतूक पोलिस धम्मा उगले, निखिल विघे, पोलिस अमलदार छत्रपति करपते, पोलीस हवालदार मंगेश श्रीराव, जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाचे प्रियांशु तायवाडे,विवेक सावरकर, हर्षल गलपट, सुरज धुर्वे, रोहित अमझरे, शेषांद्री वयले, अभिषेक अमझरे, चंदन ठाकूर, टॉपिक शेख, प्रथमेश रुपवणे, तसेच रविभाऊ परतेती मित्रपरिवाराचे रवी परतेती, कांतीलाल सिरसाम, अजय धुर्वे, सौरभ धोटे व तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे राहुल पंडागरे, यश पांडे यांचा समावेश होता.

# रामप्रसाद काणेकर, रामलाल भिलावेकर यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार





**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.14 )** – पंचायत समिती अंतर्गत चटवाबोट येथील ग्रामविकास अधिकारी रामप्रसाद काणेकर व जांबू ग्रामपंचायत चे ग्रामसेवक भिलावेकर यांना नुकताच जिल्हा परिषद अमरावती येथील मुख्यकार्यपालन अधिकारी संजिता मोहापात्रा यांचे हस्ते आदर्श ग्रामसेवक पुरस्कार सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबाबत त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष राम प्रसाद काणेकर मेळघाट मधील साद्राबाडी येथील मूळचे रहिवासी आहेत. मेळघाट मधील विविध समस्या व त्यांवरील उपयोजना यावर त्यांचा दांडगा अभ्यास आहे. आदिवासी बांधवांना पुढे नेण्यासाठी विविध माध्यमातून जाणीव जागृती करणे, तसेच पेसा कायदा व आदिवासी स्वशासन कायदा याबाबत सुध्दा त्यांचा अभ्यास आहे. ग्रामविकासासाठी त्यांनी तालुक्यात अनेक प्रयोग राबविले. त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा परिषद मार्फत त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार 2022-23 ने सन्मानित करण्यात आले. तसेच जांबू ग्रामपंचायत चे ग्रामसेवक रामलाल भिलावेकर हे देखील तालुक्यातील चीचघाट येथील रहिवासी असून मेळघाट मधील गावांचा विकास करणे हे ध्येय समोर ठेऊन प्रामाणिकपणे कार्य केले. त्यांच्याही कामाची दखल जिल्हा परिषद प्रशासनाने घेवून त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित केले. याप्रसंगी मुख्य कार्यपालन अधिकारी संजीता मोहापात्रा यांची विशेष उपस्थित होती. सर्व ग्रामसेवक हे जिल्हा परिषदेचा कणा आहे. समाजाला त्यांच्याकडून काही देणं लागते. या भावनेतून काम करून गावांचा विकास साधण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचे ग्रामसेवकांना आवाहन मोहापात्रा यांनी केले.

# शरद बोरखडे संताजी सेनेच्या तालुकाध्यक्ष पदी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – बंटी उर्फ शरद बोरखडे यांची नुकतीच संताजी सेना बहुउद्देशिय संस्थेच्या दर्यापूर तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्यांच्यावर तालुक्यात संस्थेच्या बांधणी संदर्भात विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. संताजी सेना बहुउद्देशिय संस्था ही तेली समाजाची संघटनात्मक बांधणीवर काम करते.



संस्थेचे अध्यक्ष अरुण गासे यांच्या हस्ते नुकतेच शरद बोरखडे यांना नियुक्तीचे पत्र सोपविण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी शितल राऊत व इतर मान्यवर उपस्थित होते.

# ऐन परीक्षेच्या काळात स्नेहसमेलनाची धूम!

### जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयातील प्रकार ■ विद्यार्थ्यांचा हिरमोड




**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.14 )**– येथील जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात ऐन परीक्षेच्या कालावधीत सांगळुदकर महाविद्यालयात स्नेह संमेलनाची धूम पहावयास मिळत आहे. तर दुसरीकडे परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थी अभ्यासात व्यस्त असल्याचे चित्र आहे. त्यामुळे परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांचा हिरमोड झालेला आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी 2024 च्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात विद्यापीठाची परीक्षा दि. 14 ऑक्टोबर 2024 पासून सुरू झाली आहे. ही परीक्षा 7 फेब्रुवारी 2025 ला संपणार आहे, अशी माहिती परीक्षा विभागातून मिळाली आहे. स्नेहसंमेलन परीक्षा कालावधी येत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची अनुउपस्थिती दिसून येत आहे. परीक्षा संपल्यानंतर महाविद्यालयाने स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे होते. असा सुर विद्यार्थी, पालक वर्गाकडून येत आहे. याकडे महाविद्यालयाचे प्राचार्य, आयोजन समितीने विशेष लक्ष देण्याची गरज होती. जे विद्यार्थी परीक्षेला बसले आहे त्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाचा आस्वाद घेता आला नाही. त्यामूळे त्यांचा महाविद्यालय व्यवस्थापनाविरुध्द चांगलाच रोष पहायला मिळत आहे.

# नितेश मेश्राम मृत्यूप्रकरणी सखोल चौकशी करणार!

### उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांची कुटुंबियांना भेट



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.14 )** – चांदूररेल्वे येथील नितेश मेश्राम याच्या मृत्यूप्रकरणाची चौकशी करण्यासाठी अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी त्याच्या कुटुंबियांना भेट दिली. नितेश मेश्राम याच्या मृत्यू प्रकरणी आयोग सखोल चौकशी करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी कुटुंबियांना दिली.

मेश्राम यांनी सोमवार, दि. 13 जानेवारी रोजी मेश्राम कुटुंबियांना त्यांच्या घरी जाऊन भेट दिली. यावेळी त्यांनी नितेशची आई वंदना मेश्राम यांच्याकडून संपूर्ण घटनाक्रम जाणून घेतला. नितेशच्या मृत्यूप्रकरणी वंदना मेश्राम यांनी संपूर्ण घटनाक्रम उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्यासमोर मांडला. याप्रकरणी आयोग सखोल चौकशी करणार आहे. यासाठी पोलिस ठाण्यातील दस्तावेज, सीसीटीव्ही फुटेज, चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा तपासाची कागदपत्रे, तसेच नितेश मेश्राम याच्या मृत्यूशी संबंधित पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्याकडे असलेली सर्व कागदपत्रे मागविण्यात येणार आहे, असे मेश्राम यांनी सांगितले.

या प्रकरणी सत्यता समोर येण्यासाठी घटनेच्यावेळी पोलिस ठाण्यात असलेले अधिकारी, कर्मचारी आणि रूग्णालयात दाखल करतेवेळी उपस्थित असलेल्या डॉक्टर, कर्मचारी यांचेही बयाण घेण्यात येणार आहे. नितेश मृत्यू प्रकरणी आयोगातर्फे सखोल चौकशी करण्यात येणार आहे. आयोगाच्या कार्यवाहीबाबत कुटुंबियांना सर्व माहिती पुरविली जाईल. याबाबत कुटुंबियांना आश्वस्त केले. सदर प्रकरणात पोलिस विभागातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतही मेश्राम यांनी माहिती जाणून घेतली. यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर, पोलिस विभागाचे अधिकारी, तपास करणारे अधिकारी उपस्थित होते.

### अल्पखर्चिक आणि असरदार उपाय

# जैविक कुंपण मेळघाटातील शेतकऱ्यांकरिता वरदान

### धुऱ्यावर उभे काटेरी निवडूंग करणार शेतीचे संरक्षण





**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.14 )**– सध्याचा शेतकरी हा अस्मानी संकटासोबतच वण्यप्राण्यांच्या संकटाचा सामना करत आहे, एका रात्रीतून शेकडो रुपयांचे पीक फस्त करणाऱ्या वण्यप्राण्यांच्या बंदोबस्ताकरिता एक ना अनेक उपाय शेतकऱ्यांनी करुन पाहीले, परंतू सर्वकाही निष्फळ ठरले, मात्र आता एक अल्पखर्चिक आणि असरदार उपाय शेतकऱ्यांकरिता वरदान ठरणार आहे, तो म्हणजे शेताच्या धुऱ्यावर काटेरी निवडूंगाचे जैविक कुंपण उभे करण्याचे. ही भन्नाट कल्पना शेतकऱ्यांच्या पसंतीस पडत असून मेळघाटातील अनेक शेतकरी गट आपल्या शेताच्या धुऱ्यावर काटेरी निवडूंगाची लागवड करित आहेत.

गेल्या काही दिवसांपूर्वी गावागावात 'माझा गट-माझी भरारी' हे प्रशिक्षण दिले जात असतांना अकोट तालुक्यातील खापरवाडी बू. येथील प्रयोगशील शेतकरी जगन बगाडे यांची जैविक कुंपणाची फिल्म गावागावात दाखविण्यात आली. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात हे भन्नाट कुंपण पसंतीस पडले. शेतकरी याचा पाठपुरावा करित असताना अनेक अडचणी येत होत्या. परंतु त्या अडचणींवर मात करत चिखलदरा तालुक्यातील इतर गटाच्या सहकार्याने याला यश आले आहे. संस्कृती महिला शेतकरी गट, काजलडोह येथील निमंत्रक इंदिरा कुवरसिंग उईके यांच्या शेतीच्या बांधावर जैविक कुंपण (निवडूंग) ची लागवड ईर्जिक पद्धतीने करण्यात आली. सर्वप्रथम बाहेर गावातून आलेल्या सर्व शेतकरी बांधवांचे आणि उपस्थीत मान्यवरांचे गटाने स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते जैविक कुंपण (निवडूंग) व लागवडीचे साहित्य ची पूजा केली. त्यानंतर जैविक कुंपण म्हणजे काय? त्याचे फायदे व लागवडीची पद्धत या विषयी वैभव नायसे यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. यावेळी गावाचे प्रथम नागरिक सरपंच राजेश कवडे, उपसरपंच राजेश आठोले, प्रयोगशील शेतकरी गणेश राठोड, ओम गिरी, आत्मा व्यवस्थापक गजानन राठोड, अभिनंदन महिला शेतकरी गट,बामादेही श्री. चक्रधर शेतकरी गट, दहेंद्री अन्नपूर्णा महिला शेतकरी गट, डोमा अन्नपूर्णा महिला शेतकरी गट, तोरणवाडी इंद्रधनुष्य महिला शेतकरी गट, काजलडोह जय चंदन मुरारी महिला शेतकरी गट, पलस्या सिपणा व माऊली शेतकरी गट, कटकुंभ गटातील महिला व पुरूष शेतकरी एकूण 150 हून अधिक लोक उपस्थित होते. या मध्ये SAYTREES टीम ने देखील उत्साह दाखविला.

### कुंपण पाहताच वण्यप्राणी धजावेना

जैविक वनस्पतीचे कुंपन म्हणजे जैविक कुंपण होय. हे सरळ वाढणारे काटेरी निवडुंग आहे त्याला पेरकुट देखील असेही म्हणतात. या पेरकुटाला विषारी काटे असतात. त्यामुळे जंगली जनावरे यांच्या जवळही यायला धजावित नाहीत. हे पेरकुट शेताच्या बांधावर किंवा नदी, नाला, ओढा किंवा शेत रस्ता, इत्यादी ठिकाणी बांधावर लागवड केल्याने शेताभोवती काही वर्षातच एक भिंत तयार होते. ही भिंत ओलांडून जनावरे शेतात येऊ शकत नाही .महाराष्टातील अनेक शेतकरी यांनी हे लागवड करायला सुरुवात केली आहे. जंगलक्षेत्र असलेल्या मेळघाटमध्ये याची लागवड शेतकऱ्यांकरिता वरदान ठरु शकते.

### संरक्षणासोबत उत्पन्नही

पीक उगवून आल्यापासून कापणी पर्यंत विविध अवस्था मध्ये रान डुक्कर, हरणे, ससे, रोही इत्यादी वण्यप्राण्यांपासून शेत पिकाचे नुकसान होते. या कुंपणमुळे होणारे नुकसान टाळता येईल. यासाठी बहुतांश ठिकाणी राखण करणे ( जागल करणे) शेताभोवती साड्या बांधणे, फटाके फोडणे, लाईट लावणे, चर खणणे, तारेचे कुंपन, सौर कुंपण, इलेक्ट्रिक झटका कुंपण इत्यादी उपाय केले जातात. पण जैविक कुंपण मुळे आपण या बाबींवर मात करू शकतो.तसेच यावर आपण वेल वर्गीय पिके देखील घेऊ शकतो. यामध्ये कारले, दोडके, वाल, कुयरी, इत्यादी पिके आपण घेऊ शकतो. म्हणजे शेतीला संरक्षणासोबतच वेल वर्गीय पिकांकडून उत्पन्नही प्राप्त होते.

### जाळी, तार, सोलर फेसिंगवर स्वस्त पर्याय

काटेरी तार, सोलर फेंसिंग किंवा जाळी कुंपणावर हे वनस्पतीचे कुंपण अल्पखर्चीक व त्यापेक्षा कितीतरी बळकट व सुरक्षित असल्याचे पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक शिवहरी टेके, वैभव नायसे, पंढरी हेकडे यांनी सांगितले. त्यामुळे बरेच शेतकरी निवडूंग लावण्यास तयार आहेत. परंतु सध्या याचे रोप जास्त उपलब्ध नसल्याने आपल्याच भागामध्ये या रोप कसे वाढविता येईल यावर चर्चा केली. हे रोप ग्राम बिबा येथील मुंगीलाल कासदेकर यांच्या शेतातून आणण्यात आले.

# कलेतून जनजागृती करणारी तालुकास्तरीय रांगोळी स्पर्धा

### स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे आयोजन






**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.14 )**– मोबाईल वापरामूळे चाकोरीत अडलेले बालपण आणि मोबाईलचा दुष्परीणाम यावर जनजागृती करणाऱ्या तालुकास्तरीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन येथील माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयात करण्यात आले होते.

राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने या तालुकास्तरीय भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुकास्तरीय विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता. एकंदरीत 200 च्या आसपास रांगोळी काढणाऱ्या पालक, स्पर्धकांनी उत्तम रांगोळी अविष्काराचे प्रदर्शन केले. संपूर्ण स्पर्धेदरम्यान विषयाला अनुसरून अथक परिश्रम घेतले. त्यात परीक्षण झाल्यावर प्रथम पारितोषिक लोणी येथील न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश स्कूल शाळेची भार्गवी पाटील केजी 1 ची माता पालक वीणा पाटील यांना मिळाले. व्दितीय पारितोषिक एनटीआर स्कूल ची आकांशा भालेराव हिने




पटकाविला, तृतीय पारितोषिक स्थानिक स्व.माणिकलालजी जागृत चा विद्यार्थी कुशल क्षीरसागर यांची माता पालक वैशाली क्षीरसागर यांनी तसेच पटकाविले. प्रोत्साहन पारितोषिक जरुड येथील वसंतराव नाईक हायस्कूल ची डिंपल देवतळे हिला प्राप्त झाला. या स्पर्धेत आकर्षक बक्षिसे म्हणून चांडक ब्रदर्स चे संचालक अनिल उर्फ मुन्नाभाई चांडक यांचेकडून 10 हजार रुपये, द्वितीय पारितोषिक जी.जी.टी स्मार्ट स्टोअर्स चे संचालक गौरव घनश्याम तीमखेडे यांचेकडून 7 हजार, तृतीय पारितोषिक गावंडे ज्वेलर्स चे संचालक निलेश गावंडे यांचेकडून 5 हजार रुपये तसेच प्रोत्साहन चतुर्थ पारितोषिक सुरजुसे एक्सीडेंटल हॉस्पिटलचे संचालक डॉ.पंकज सुरजुसे यांचे कडून 3 हजार रुपये या स्वरूपात विजयी स्पर्धकांना येत्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी पारितोषिक वितरणाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे रोख रक्कम सोबत प्रत्येकी ट्रॉफी आणि सर्व सहभागी स्पर्धक माता पालक यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आकर्षक ट्रॉफी चे सहयोगी पलाश राऊत, सतीश गोरे, साईकृपा एंटरप्राईजेस आणि मारोतराव धूताले यांचेकडून प्राप्त झाले. या स्पर्धेत आयोजक म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आडे, ज्येष्ठ शिक्षक प्रवीण बोहरूपी, कला शिक्षिका स्विटी इंगळे, प्रशांत वडे, सुनील उईके, निरंजना तडस, वैशाली पांडे आणि प्रज्वल बोंडे यांनी नियोजन केले. मातृ शक्तीला वंदन आणि मातृशक्तीचा जागर या हेतूने प्रेरित होऊन संस्थेच्या सर्व पदाधिकारी आणि विद्यालयाने यावर्षी प्रथमच तालुका स्तरीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.